UGC CARE LISTED
ISSN No.2394-5990

# संशोधक

वर्ष : ९२ • मार्च २०२४ • पुरवणी विशेषांक ०८




प्रकाशक : इतिहासाचार्य वि.का.राजवाडे संशोधन मंडळ, धुळे

Scanned with OKEN Scanner

UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

# इतिहासाचार्य वि. का. राजवाडे मंडळ, धुळे
# या संस्थेचे त्रैमासिक

# ॥ संशोधक ॥

**पुरवणी अंक ८ – मार्च २०२४ (त्रैमासिक)**

- शके १९४५ • वर्ष : ९२ • पुरवणी अंक : ८

**संपादक मंडळ**

- प्राचार्य डॉ. सर्जेराव भामरे
- प्राचार्य डॉ. अनिल माणिक बैसाणे
- प्रा. डॉ. मृदुला वर्मा
- प्रा. श्रीपाद नांदेडकर

**अतिथी संपादक**

- प्राचार्य डॉ. के. एच. शिंदे • डॉ. एस. व्ही. पणदे • डॉ. बी. एम. मगदूम

**✸ प्रकाशक ✸**

**श्री. संजय मुंदडा**

कार्याध्यक्ष, इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१
दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४२२२८९४७१, ९४०४५७७०२०
Email ID : rajwademandaldhule1@gmail.com
rajwademandaldhule2@gmail.com

**कार्यालयीन वेळ**

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवारी सुट्टी)

अंक मूल्य रु. १००/-
वार्षिक वर्गणी (फक्त अंक) रु. ५००/-, लेख सदस्यता वर्गणी : रु. २५००/-

**विशेष सूचना :** संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्टने
'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

**अक्षरजुळणी :** सौ. सीमा शिंत्रे, पुणे.

टीप : या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

Scanned with OKEN Scanner

६१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्रीमुक्तीतील योगदान

- डॉ. काशिनाथ जगन्नाथ सोलनकर ---------------------------------------- २६४

६२. महिला सक्षमीकरणा मध्ये 'मदर इंडिया' चित्रपटाचे योगदान

- १) गडगे शांता रंगनाथ २) डॉ. के.एम. अंबाडे ---------------------------- २६७

६३. सांख्यिकी शास्त्रज्ञ सी. आर. राव यांच्या संशोधनाचे मूल्य

- विजय कोष्टी ---------------------------------------------------------- २७०

६४. स्त्रीवादी चळवळ

- कु. योगिता रामचंद्र रेवडे ------------------------------------------------- २७४

६५. स्वातंत्र्य चळवळीत आदिवासी क्रांतिकारक बिरसा मुंडा यांचे योगदान

- प्रा. रामदास रमेश वसावे ------------------------------------------------ २७७

६६. डॉ. बाबासाहेब आंबेडकर : महिला सक्षमीकरण विचार व सद्यस्थिती

- १) मोनाली सिध्दार्थ लोंढे, २) प्रा. डॉ. संजय गायकवाड --------------------- २८१

६७. दलित चळवळीच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा सामाजिक दृष्टिकोनातून चिकित्सात्मक अभ्यास

- १) रोशनी बाबुराव कांबळे, २) प्राचार्य डॉ.अशोक केशवराव सपाटे --------------- २८५

६८. भारतीय इतिहासलेखन आणि सबाल्टर्न इतिहासलेखन परंपरा

- १) डॉ. मल्लिकार्जुन बंदारे, २) डॉ. हाजी नदाफ -------------------------------- २९०

६९. स्वातंत्र्यसैनिक डॉ. सत्यवती लिमये

- प्रा. कल्याण जयसिंगराव चव्हाण ------------------------------------------ २९४

७०. स्त्री - जीवनाचे विविध पैलू

- १) डॉ. उज्वला पाटील, २) प्रा. डॉ. विश्वनाथ पवार, ३) डॉ. राजेंद्र सोनावले ----- २९८

७१. इतिहासातील नवविचारप्रवाह दृष्टीकोन या संदर्भात वंचितवादी इतिहास लेखन प्रवाहाचे चिकित्सक परिक्षण

- प्रा.डॉ. संतोष तुकाराम कदम --------------------------------------------- ३०२

७२. ग्रामीण भागातील दुग्ध व्यवसायाची भूमिका

- १) एस. आर. कुंडले २) डॉ. पी. बी. पाटील ३) डॉ. ए.एस. कांबळे ----------- ३०६

# ग्रामीण भागातील दुग्ध व्यवसायाची भूमिका

**1) Mr. S. R. Kundle**
Research Student ( Dept.of Economics)
kundlesagar2015@gmail.com
Mob.No.9158676307

**2) Dr. P. B. Patil**

**3) Dr. A. S. Kamble**
Dr. Patangrao Kadam Mahavidyalaya,
Ramanandnagar (Burli)Tal. Palus, Dist. Sangali (MS) - 416308

**प्रस्तावना :**

भारत हा कृषी प्रधान देश आहे. आजही २१ व्या शतकामध्ये भारतामध्ये ७० % लोक संख्या शेती हा व्यवसाय करीत आहे. शेती व्यवसायाला जोडधंदा म्हणून पशुपालन हा व्यवसाय केला जातो. त्यामध्ये दुग्ध व्यवसाय ग्रामीण विकासातील महत्त्वाची भूमिका पार पाडत आहे. आजही ग्रामीण भागातील दुग्ध व्यवसायाने बागायत पीकपासून मिळणारे उत्पनाला मागे टाकले आहे .शेती आद्यारीत क्रियाकल्पाचा एक सहाय्यक प्रकार म्हणून पशुसंवर्धन हा भारताचा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे. विकसीत देशामध्ये केवळ ३% लोकसंख्या पिक उत्पादन आणि पशुपालनावर अवलंबून आहे

**दुग्ध व्यवसायाची पार्श्वभूमी :**

परंपरागत कौटुंबिक संस्थापासून दुग्ध व्यवसाय हा आज एक प्रगत दुग्ध व्यवसाय हा आज एक विशेष आणि सुस्थापित दुग्ध व्यवसाय बनला आहे. दुधास पूर्णान्न म्हणून संबोधले जाते त्यामुळे मानवाच्या दैनंदिन आहारात दुधाचा सहभाग आवश्यक ठरतो .भारत हा देश ग्रामीण भागात विखुरला असल्यामुळे ग्रामीण भागात अन्य उद्योगांचा विकास न झाल्यामुळे युवकांचा दुध व्यवसायाकडे ओघ वाढत आहे. शेती व्यवसाय हा हंगामी स्वरूपाचा असल्यामुळे या व्यवसायामधून उत्पन्न अल्प आहे.

दुग्ध व्यवसाय हा प्राचीन काळी गावभागामध्ये संकलन केले जात होते. त्यानंतर दुग्ध व्यवसायचे जाळे वाढत गेले आणि तालुका व जिल्हास्तरावर विकले जाऊ लागले . दुग्ध व्यवसायात वाढ तत्कालीन पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांची इच्छा पूर्ण करण्यासाठी डॉ.वर्गीस कुरियन यांनी १९६५ मध्ये राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळ स्थापन केली. या मंडळाचे यश म्हणजे शेतकऱ्यांचे कौशल्य आणि ताकद, व्यावसायिक व्यवस्थापन, सोबत जोडून दुग्ध आणि दुग्धजन्य पदार्थांच्या बाजारपेठा यशस्वीपणे काबीज केल्या आणि मेहनत व सेवांसह शेतकऱ्याच्या गुंतवणुकीला पाठिंबा दिला. त्यामुळे देशात श्वेतक्रांती घडून आल्यामुळे देश दुग्ध व्यवसाय मध्ये स्वावलंबी झाला.

**दुग्ध व्यवसायाची व्याख्या**

**१) माथुर (२०००) यांच्यामते ,**

''ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांना दुग्ध सहकारी संस्थांच्या निर्मितीचा थेट परिणाम म्हणून अधिक स्वायत्ता प्राप्त झाली आहे''

**२) बंधोपाध्याय (१९९६),**

''ग्रामीण भागातील जीवन मानत एकूण सुधारणा, ग्रामीण भागातील एकंदर जीवनमान सुधारण्यात दुग्ध सहकारी संस्थांची भूमिका मोलाची ठरली आहे.''

**दुग्ध व्यवसायाची प्रगती**

सन १९७० ते १९९६ अशी एकूण २६ वर्षे ऑपरेशन फ्लड ही योजना कार्यरत होती. हे ऑपरेशन दुधाचे उत्पादन वाढवण्यासाठी, शेतकऱ्याचे उत्पादन वाढविण्यासाठी आणि ग्राहकांना रास्त भाव मिळवून देण्यासाठी सुरु करण्यात आली. या योजनेचे फलित म्हणून 'अमूल', 'गोकुळ', 'महानंदा' यासारख्या अनेक सहकारी व खाजगी दुग्ध संस्था स्थापन झाल्या.



Scanned with OKEN Scanner

ISSN No. 2394-5990

| Milk production and per capita availability of milk in India | | |
|---|---|---|
| Year | Production (Million Tonnes) | Per Capita Availibilty (gms/day) |
| 1991-92 | 55.6 | 178 |
| 1992-93 | 58.0 | 182 |
| 1993-94 | 60.6 | 186 |
| 1994-95 | 63.8 | 192 |
| 1995-96 | 66.2 | 195 |
| 1996-97 | 69.1 | 200 |
| 1997-98 | 72.1 | 205 |
| 1998-99 | 75.4 | 210 |
| 1999-2000 | 78.3 | 214 |
| 2000-01 | 80.6 | 217 |
| 2001-02 | 84.4 | 222 |
| 2002-03 | 86.2 | 224 |



Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| 2003-04 | 88.1 | 225 |
| 2004-05 | 92.5 | 233 |
| 2005-06 | 97.1 | 241 |
| 2006-07 | 102.6 | 251 |
| 2007-08 | 107.9 | 260 |
| 2008-09 | 112.2 | 266 |
| 2009-10 | 116.4 | 273 |
| 2010-11 | 121.8 | 281 |
| 2011-12 | 127.9 | 290 |
| 2012-13 | 132.4 | 299 |
| 2013-14 | 137.7 | 307 |
| 2014-15 | 146.3 | 322 |
| 2015-16 | 155.5 | 337 |
| 2016-17 | 165.4 | 355 |
| 2017-18 | 176.3 | 375 |
| 2018-19 | 187.7 | 394 |
| 2019-20 | 198.4 | 406 |
| 2020-21 | 210.0 | 427 |
| 2021-22 | 221.1 | 444 |

Source: Basic Animal Husbandry Statistics, MoFAHD, DAHD, GoI



Scanned with OKEN Scanner

ISSN No. 2394-5990

वरील तकत्यावरून असे स्पष्ट होते की, दुधाच्या दरडोई उत्पन्नामध्ये वाढ होत आहे.

**ग्रामीण भागातील दुग्ध व्यवसायाची भूमिका :**

**१. रोजगार :**

दुग्ध व्यवसाय हा शेती व्यवसायास जोड व्यवसाय म्हणून पाहिला जातो. ग्रामीण भागातील १८ दशलक्ष लोकांना रोजगाराची संधी उपलब्ध करून दिली जाते. त्यामधील जवळपास ७०% महिला वर्ग काम करतात. ग्रामीण भागातील ६५% ते ७० % शेतकरी अल्प भूधारक व भूमीहीन आहेत. या शेतकऱ्याना दुग्ध व्यवसायामधून मोठ्या प्रमाणामध्ये रोजगाराची संधी उपलब्ध होते. सुमारे १२० दशलक्ष ग्रामीण कुटुंब मोठ्या विशेष दुग्ध उत्पादक शेतकऱ्याच्या तुलनेत दुग्ध उत्पादनाच्या कार्यात गुंतलेले आहेत. दुग्ध व्यवसायामुळे देशाच्या ऋछ्ञ मध्ये वाढ झालेली आहे.

**२. सामाजिक ऐक्य :**

दुग्ध व्यवसायामध्ये सभासदत्व हे समाजातील सर्व वर्गासाठी खुले असल्याने त्यामध्ये जातपात, धर्म, वंश असा कोणत्याही प्रकारचा भेदभाव केला जात नाही. सामाजिक प्रभावाचे सामाजिक परिमाण समुदाय विकास, सामुदायिक लवचिकता,उपजीविका, सामाजिक समानता, आरोग्य आणि श्रम याचा समावेश होतो. दुध उत्पादक दुग्धव्यवसायाच्या नवीन तंत्रज्ञानाबद्दल अधिक जागरूक होत आहेत.

**३. लोकशाही नियमन पद्धती व कारभार :**

सहकारी दुग्ध संस्थांचा कारभार हा लोकशाही पद्धतीने चालत असतो. त्यामुळे सर्व लोकांना प्रतिनिधित्व करण्याची संधी दिली जाते. एक व्यक्ती एक मत या तत्वानुसार सर्व व्यक्तींचे मत विचारात घेतले जाते. दुग्ध संस्थांचे व्यवस्थापन संचालक मंडळातर्फे पाहिले जाते. संचालक मंडळातर्फे ग्राहकांच्या विकासासाठी हिताचे निर्णय घेतले जातात.

**४. महिला सक्षमीकरण –**

दुग्ध व्यवसाय सर्वात जास्त जोगदान महिलांचे आहे. महिला वर्ग स्वतःचे निर्णय घेण्यास सक्षम बनतात. जसे की, जनावरांची काळजी घेणे, दुध काढणे, तसेच दुग्धजन्य पदार्थ तयार करणे, यासारखी कामे करतात.. महिलान बचत गटाच्या माध्यमातून दुग्ध व्यवसायासाठी कर्ज पुरवठा केला जातो. त्यामुळे महिला दुग्ध व्यवसायाला पूरक वेगवेगळे व्यवसाय करत आहेत. त्यामळे महिलांच्या सर्वांगीण विकासामध्ये अमुलाग्र बदल झाला आहे.

**५. बेरोजारीचे प्रमाण कमी होते.**

ग्रामीण भागातील उच्च विद्याविभूषित युवकाना रोजगारची संधी उपलब्ध नसल्यामुळे आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून दुग्धव्यवसाय व्यवस्थितपणे करत आहेत,त्यामुळे युवकांच्या उत्पनामध्ये वाढ होत आहे. त्यामुळे बेरोजगारीचे प्रमाण कमी झाले आहे.

**६. दुग्धजन्य पदार्थांची निर्मिती :**

दुधापासून वेगवेगळ्या प्रकारांचे पदार्थ बनवले जातात त्यामध्ये पनीर, लस्सी, श्रीखंड, बासुंदी, खवा,तक दही असे पदार्थ बनवले जातात. दुधाची मागणी मोठ्या प्रमाणात असल्यामुळे शेतकरी वर्गाला त्याचा नक्कीच दुग्धव्यवसामध्ये फायदा होत आहे.

**७. प्रगतशील दुग्धव्यवसाय :**

दुग्ध व्यवसायासाठी बारमाही चारा उपलब्ध होईल यासाठी आधुनिक पिक पद्धतीचा अवलंब केला जात आहे. सुधारीत गार्यींच्या व म्हैशीच्या जाती, उत्तम आहार पद्धती, आधुनिक प्रकारचे गोठे, दुध काढण्यासाठी आधुनिक प्रकारच्या मशीनचा वापर केला जात आहे. त्यामुळे दुग्धव्यवसायाचे उत्पन्न वाढीमध्ये मोठे योगदान आहे.

**दुग्धव्यवसायातील मर्यादा :**

१. वैद्यकीय सुविधांचा अभाव
२. संतुलित पशुखाद्याविषयी अपुरे ज्ञान
३. हिरवा व कोरडा चाऱ्याची वर्षभर उपलब्धता नसणे
४. गावामधून संघटीत दुध विपणन सुविधाचा अभाव
५. चारा लागवडीसाठी जमीन उपलब्ध नसणे.
६. दुध दरात सतत घसरण

**संदर्भ ग्रंथ :**

१. लुड.व्ही.आणि अलजर्स
२. कुंभकर एस. सी., बेली.डी,. विश्वास बी.
३. कृषी आणि ग्रामीण विकासासाठी राष्ट्रीय बँक
४. पशु वैद्यकीय हेल्पलाईन इंडिया
५. National Dairy Development Board
६. वर्तमानपत्रे – लोकमत , तरुण भारत, पुढारी
७. https://www.nddb.coop/information/stats/milkprodindia

■■■